# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२३ ( ) जंगल, जल, जमीन, पशु या मनुष्य जीवनातील मुलभूत गरजा झाल्या असून या टिकवल्या तर शाश्वत विकास निश्चित आहे, असे प्रतिपादन बारीपाडा येथील कार्यकर्ते चैत्राम पवार यांनी जलसंजीवनी श्रमदान शिबीर प्रसंगी आयोजित ` ग्रामविकास `या विषयावर बोलताना केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरातील संभाव्य पाणी टंचाईकमी करण्यासाठी दि. २१ मे पासून पाच दिवसीय जलसंजिवनी श्रमदान शिबिर सुरु झाले असून आज शिबिराच्या तिसऱ्या दिवशी राष्ट्रीय सेवायोजनेच्या १५० विद्यार्थ्यांनी सकाळ व सायंकाळच्या सत्रात क्रीडा संकुलालगत तलावाचे खोलीकरण, आरोग्य केंद्राजवळील बंधाऱ्याचे पिंचिंग आणि आमराईतील आळे दुरुस्तीची कामे केली.

दुपारच्या सत्रात चैत्राम पवार यांनी साक्री तालुक्यातील बारीपाडा गावात राबविलेल्या विविध योजना, पर्यावरण संवर्धन, जलसंवर्धन आदींबाबत सविस्तर माहिती शिबिरार्थी विद्यार्थ्यांना दिली. पुढे बोलताना ते म्हणाले की, स्वतःच्या गरजा कमी करुन गावासाठी विकास साधणे ही आजच्या काळाजी गरज झाली आहे. श्रमदानातून जीवनातील अनेक गोष्टी सोप्या होतात. त्यात माणसे जोडली जातात तेव्हा पैशांपैक्षा माणसे जोडायला शिका तसेच मित्र जसे मिळतात तसा माणूस घडतो. त्यामुळे मित्र असा निवडा की त्याने आयुष्यभर साथ दिली पाहिजे. वृक्षतोड थांबवून पर्यावरणाचे संवर्धन करण्याची जबाबदारी आपली आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ.कांचन महाजन होते.

दुसऱ्या सत्रात शहादा येथील नगराध्यक्ष मोतीलाल पाटील यांनी स्वानुभव कथन करताना ग्लोबल वॉर्मिंगमुळे पाण्याचे संकट ओढावले आहे, ते टाळण्यासाठी झाडे लावणे गरजेचे आहे. शहादा येथे नदी नांगरणी प्रकल्पाद्वारे पाण्याची पातळी वाढविण्यात आलेल्या यशाबद्दलचे अनुभव यावेळी त्यांनी सांगितले.

या व्याख्यानाप्रसंगी व्य.प.सदस्य दिलीप पाटील, अधिसभा सदस्य मनिषा चौधरी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी रासेयो संचालक प्रा.पंकजकुमार नन्नवरे होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रोहिणी पाटील व वैशाली पाटील या विद्यार्थ्यांनी केले. सचिन गव्हाणे याने आभार मानले.

---

जा.क्रः कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २३ मे, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी